साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ३० जून २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

# २९ ऑगस्टला आरक्षणासाठी मंत्रालयावर मराठ्यांचा मोर्चा

## रविवारी अंतरवलीत झालेल्या बैठकीत निर्णय

वडीगोद्री (बातमीदार):- मराठा समाजाचे ज्येष्ठ नेते मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.२९) अंतरवली सराटी येथे मराठा समाजाच्या हजारो नेते व कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीत मराठा समाजाच्या आरक्षणप्रश्नी पुन्हा एकदा मुंबईला मंत्रालयावर २९ ऑगस्टला मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा समाज आक्रमक होताना दिसत आहेत. श्री जरांगे पाटील यांच्याकडून सातत्याने मराठा आरक्षणासाठी उपोषण आणि आंदोलने करण्यात आली आहे. त्यांच्या काही मागण्यांना सरकारने मान्यता दिली असली तरी त्यांचं पुरेसं समाधान झालेलं नाही. त्यामुळे आपल्या विविध मागण्यांसाठी आता पुन्हा एकदा मराठा समाज मुंबई गाठणार आहेत. श्री जरांगे पाटील यांनी याआधी देखील मुंबईच्या दिशेला मोर्चा आणला होता.



पण त्यावेळी ते आंदोलन वाशीपर्यंत रोखण्यात सरकारला यश आलं होतं. त्यानंतरही दिलेली आश्वासने पूर्ण झाली नाहीत म्हणून श्री जरांगे पाटील यांनी मुंबईला मंत्रालयावर मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी रविवारी (दि.२९) अंतरवली सराटीत बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीवेळी श्री जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टला मुंबई गाठायची अशी घोषणा केली. २७ ऑगस्टला निघायचं आणि न थांबता २ दिवसांत मुंबईत जायचं, असं श्री जरांगे पाटील म्हणाले.

दरम्यान, श्री जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत निघणारा मोर्चा २७ ऑगस्टला अंतरली सराटी गावातून निघेल. तिथून तो शहागड, पैठण आणि शेवगाव मार्गे पुढे पांढरीपूल, अहिल्यानगर, नेप्टी नाका मार्गे आळेफाटा, शिवनेरी दर्शन, माळशेज घाट, कल्याण, वाशी, चेंबूर, मंत्रालय असा असेल. अशी माहिती यावेळी मिळाली. या मोर्चाला समाजातील सर्व स्तरातील कार्यकर्त्यांनी यावे असे आवाहन करत ही लढाई आता आरपारची आहे, जिंकल्याशिवाय वापसी नाही असेही श्री जरांगे पाटील म्हणाले. मराठा कुणबी एकच असल्याचा जीआर काढा, हैदराबाद, सातारा, बॉम्बे गॅझेटियर लागू करा, मराठा आंदोलकांवरील खटले मागे घ्या, मराठा आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबातील सदस्याला नोकरी व आर्थिक मदत द्या, शिंदे समितीला मुदतवाढ द्या आदी मागण्या या आंदोलनात करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ***

## विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून




मुंबई (बातमीदार): विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवारी (दि.३०) पासून मुंबईत सुरू होणार आहे.

या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रविवारी झालेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. पहिलीपासून तृतीय भाषा म्हणून हिंदीला विरोध करण्यासाठी विरोधी पक्षाने आयोजित केलेला मोर्चा, शेतकऱ्यांचा विरोध डावलून शक्तिपीठ महामार्गाला दिलेली चालना, शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारने केलेले घुमजाव, अंदाज समितीच्या धुळे दौऱ्यात सापडलेले कोट्यवधी रुपयांचे घबाड, पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण, पावसामुळे मुंबई, पुणे यांसारख्या शहरांची उडालेली दणादण आदी मुद्दे या अधिवेशनात गाजण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारने आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. हे अधिवेशन तीन आठवडे चालणार असल्याची माहिती देण्यात आली. ***

# 'असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया'संघटनेची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

पुणे (बातमीदार):- असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी केली आहे.

या राज्य कार्यकारणी मधील पदाधिकारी व सदस्य पुढील प्रमाणे. राज्य उपाध्यक्ष-गोरख तावरे कराड सातारा, भिका तुकडू चौधरी जळगाव, **राज्यसचिव**-सुभाष लहाने बुलढाणा, **राज्य संघटक**- सुमित सुनीलराव कुलकर्णी श्रीरामपूर, **महिला आघाडी प्रमुख**- सौ तेजस्विनी सूर्यवंशी सांगली, **संघटन सचिव**- नेताजी मेश्राम गडचिरोली, **सहसचिव**- हेमंतू देसाई धर्माबाद नांदेड, **संघटन सहसचिव**-भीमराव ऊल्हारे अहिल्यानगर, **राज्य कार्यकारिणी सदस्य**-एस.एल. वाकडे परळी वैजनाथ, भगवान नागोराव शहाणे छत्रपती संभाजीनगर, रवींद्र वाघ बुलढाणा, सौ शोभा जयपुरकर, नागपूर, ओम प्रकाश शिंदे, जालना, **विभागीय अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर**- आत्मलिंग शेटे, परळी वैजनाथ, **लातूर**- विठ्ठलराव भानुदास राव राऊत, **बीड जिल्हाध्यक्ष**-दिगंबर माणिकराव सोळंके आदींची निवड करण्यात आली आहे. ***

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या अध्यक्षांकडून कामकाजाचा आढावा




बीड, (जिमाका) : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी आज बीडच्या जालना रोड येथे होत असलेल्या महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाच्या जागेची पाहणी केली. यासह याठिकाणी महामंडळाच्या कामकाजाचा सविस्तर आढावाही घेतला.मराठवाड्यातील महामंडळाचे सर्व जिल्हा समन्वयक, संबंधित कर्मचारी उपस्थित होते. मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे मराठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले. ***

## जिगा दाबेली अँड पिझ्झा कॅफेचा परळीत मंगळवारी शुभारंभ!




परळी वैजनाथ (बातमीदार):- परळीतील खवय्येकरांसाठी नव्याने सुरू होत असलेल्या जिगा दाबेली अँड पिझ्झा कॅफेचे उद्घाटन शुभारंभ ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांच्या शुभहस्ते आज दिनांक १ जुलै वार मंगळवार रोजी सायंकाळी ४ वाजता संपन्न होत असून या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून सिने अभिनेत्री गौतमी पाटील आणि मिस युनिव्हर्स रूपल मेहता, वैद्यनाथ देवल कमिटीचे सचिव राजेशजी देशमुख, डी.पी.आय महिला अध्यक्ष बीड श्रीमती उषाताई चव्हाण, महेश बँकेचे चेअरमन ओमप्रकाशजी सारडा यांच्या विशेष उपस्थितीमध्ये भव्य दिव्य असा सोहळा संपन्न होत आहे.

मराठवाडा ग्रामीण बँकेच्या शेजारी हाडबे हॉस्पिटल रोड येथे हा शुभारंभ सोहळा संपन्न होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिगा दाबेली अँड पिझ्झा सेंटरच्या संचालिका श्रीमती शिला माणिक राठोड, जिगा दाबेली अँड पिझ्झा सेंटरचे संस्थापक राजेंद्र कुमार शंकर सुतार, श्रीमती राजश्री राजेंद्र कुमार सुतार, शिवाजीराव राठोड, विठ्ठलराव घोडके, सिने अभिनेते व निर्माते प्रशांतजी तोतला यांचीही उपस्थिती राहणार आहे. परळीतील सर्व खवयगिरींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन कार्यक्रमाचे स्वागत प्रमुख सुखदेवजी चव्हाण आणि संतोषजी राठोड तसेच समस्त राठोड परिवार यांनी केले आहे.***

# ‘ज्ञानोबा-तुकाराम’ च्या जयघोष; अ.भा.वारकरी भजनी मंडळाचा उपक्रम

## टाळ-मृदंगाच्या गजरात संत नामदेव महाराजांचा रिंगण सोहळा परळीत संपन्न

परळी वैजनाथ (बातमीदार):- अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली संतशिरोमणी श्री नामदेव महाराज पालखी रिंगण सोहळा आज बुधवार, दिनांक २५ जून २०२५ रोजी परळी वैजनाथ येथे भक्तिभावात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला. नाथ रोडवरील जत्रा मैदानावर सायंकाळी ४ वाजता पार पडलेल्या या दिव्य सोहळ्याला हजारो भाविक, वारकरी बांधव, महिला भजनी मंडळे आणि परळी पंचक्रोशीतील श्रद्धाळू यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

हा सोहळा अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली भक्तिरसात न्हालेल्या वातावरणात पार पडला. टाळ, मृदंग, अभंगगायन आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

नामदेव महाराजांच्या पादुकांची रिंगणात पारंपरिक पद्धतीने मिरवणूक झाली. रिंगणामध्ये वारकऱ्यांनी उभ्या पंक्तीत उभे राहून अभंगांचे गायन केले, तर महिलांनी एकनाथी भाव गात रिंगणास भक्तिभावाने वंदन केले. यावेळी बोलताना ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे म्हणाले की संतप्रेम, भक्ती आणि वारकरी चळवळीचे ज्वलंत प्रतीक असून संत नामदेव महाराजांचा भक्तीमार्ग हा लोकशिक्षणाचा मार्ग आहे. भक्ती, सेवा आणि समर्पण हीच खरी वारीची ओळख असल्याचे अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे



संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी सांगितले.

हा रिंगण सोहळा सलग चौथ्या वर्षी परळी वैजनाथ नगरीत आयोजित करण्यात आला होता. परळीतील भाविक या सोहळ्यासाठी फार आतुरतेने वाट पाहत असतात. संपूर्ण परिसरात अध्यात्मिक उत्साहाचं वातावरण निर्माण झालं होतं.

या प्रसंगी ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी मार्गदर्शन करताना संत नामदेव महाराजांच्या जीवनकार्याचा उल्लेख केला आणि भक्तीमार्गाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांनी सर्वांना भक्तिमार्गाचे पालन करण्याचे आवाहन केले.

या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून तालुका अध्यक्ष विश्वंभर महाराज उखळीकर, शहराध्यक्ष अशोक महाराज कराळे, तालुका संपर्कप्रमुख मंगेश महाराज मुंडे, जिल्हा महिला अध्यक्षा राधिकाताई जायभाये, संपर्कप्रमुख चेतनाताई गौरशेटे, तालुकाध्यक्ष शोभाताई भास्करराव चाटे, शहराध्यक्ष सुरेखाताई मेनकुदळे, स्वातीताई ताटे यांच्यासह अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या विविध शाखांचे पदाधिकारी, सदस्य आणि महिला मंडळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भक्तिरसात न्हालेल्या रिंगण सोहळ्याची सांगता हरिपाठ व महाआरतीने करण्यात आली. उपस्थित भाविकांनी या सोहळ्याचा अध्यात्मिक आनंद घेत, संत नामदेव महाराजांच्या कृपेचा लाभ घेतला.

या रिंगण सोहळ्यामध्ये विशेष उपस्थिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सूर्यभान नाना मुंडे या परिमहा संघाच्या जिल्हाचे अध्यक्ष माऊली दादा फड उद्योगपती नितीन लाहोटी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके शीनाथ प्रतिसाद चे सचिव प्राध्यापक प्रदीप खाडे प्राचार्य अतुल दुबे सर बियाणी शेठ ह भ प नानवटे गुरुजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रामदासी विद्यासागर स्वामी ह भ प गोविंद महाराज मुंडे ह भ प बंडू महाराज ढाकणे करण महाराज दत्त महाराज पुरी नानेकर सर व कन्हैया आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या शाखेच्या अध्यक्ष परळी तालुक्यातील सर्व पदाधिकारी महिला यांच्या यांच्या उपस्थितीमध्ये भैय्या धर्माधिकारी यांना माऊली महाराजांच्या रूपे महोत्सवानिमित्त पुरस्कार जाहीर केला होता तो आज रिंगण सोहळ्यामध्ये देण्यात आला सर्व आलेल्या मान्यवरांचा भजी मंडळाचे महिलांचं दिंडीतील वारकऱ्यांचं दिंडी चालकांचं व व सर्व संपादक तथा पत्रकार मीडिया पत्रकार बांधवांचे ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी मानले आभार.

या या रिंगण सोहळ्यामध्ये महाराष्ट्राचा महागायक सुभाष शेप व अश्विनीताई बडे यांच्या मधुर आवाजाने विठ्ठल नामाचा गजर करत रिंगण सोहळ्यामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले. या रिंगण सोहळ्यामध्ये अश्व श्री नामदेव महाराज पालखीतील दोन अश्व व गणेश दीपक देशमुख यांचे तीन अश्व असे एकूण पाच अश्व रिंगणात धावले माऊली माऊली माऊली माऊली नामाचा गजर करत अश्व यांनी सात फेऱ्या मारल्या. या रिंगण सोहळ्यासाठी अतिशय सहकार्य लाभले जीवन अन्ना शिंदे माऊली शिंदे बाळूमामा शिंदे परिवाराने अतिशय मोलाचे सहकार्य केले याबद्दल देखील कोकाटे महाराजांनी शिंदे परिवाराचे मोलाचे आभार मानले.***

# करू संतांचे पूजन या विचाराने वारकरी संप्रदायातील नामवंत कीर्तनकार श्री सोनवणे महाराजांचे आदरातिथ्य

परळी वैजनाथ, (बातमीदार):- डॉ. पांडुरंग फड यांच्या फड मल्टीस्पेशालिट हॉस्पिटलला ह.भ.प.भागवताचार्य रामायणाचार्य श्री जगदीश महाराज सोनवणे यांची सदिच्छा भेट प्रसंगी श्री जगदीश महाराजांचा आदरसन्मान करण्यात आला.

परळी तालुक्यातील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ (हाडाचे) तज्ञ डॉ.पांडुरंग गंगाधर फड साहेब (फड मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल) यांच्या वतीने भागवताचार्य ह भ प युवा किर्तनकार श्री जगदीश महाराज सोनवणे (अध्यक्ष श्री रत्नेश्वर वारकरी शिक्षण संस्था टोकवाडी) यांनी सदिच्छा भेट दिली त्याबद्दल महाराजांचा हृदयपूर्वक आदरसत्कार करण्यात आला.

वारकरी संप्रदायात संतपूजन ही केवळ एक संकल्पना नसून, ती या संप्रदायाचा एक अविभाज्य भाग आहे. विठ्ठल भक्तीइतकंच महत्त्व या संप्रदायात संतांना दिलं जातं. संतांना देवाच्या बरोबरीने मानलं जातं आणि त्यांच्या आदरातिथ्याला विशेष महत्त्व आहे.

यावेळी श्री गंगाधर फड , डॉ पांडुरंग फड,डॉ सिद्धेश्वर फड(चूड )डॉ



शुभांगी पांडुरंग फड ( भुलतज्ञ) मधुकर फड, ज्ञानेश्वर गुट्टे प्रयोग शाळा तंत्रज्ञ ,श्री बळीराम सोनवणे ( वैद्यनाथ बँक सोनपेठ शाखाधिकारी) राऊत मामा आदी मान्यवर उपस्थित होते.महाराजांनी डॉ.साहेबांबद्दल सांगितले अगदी गोरगरीब जनतेची आदराने, थोरामोठ्यांचा मान ठेवून, त्यांची आपुलकीने विचारपूस करत , अत्यंत अल्प दराने पेशंटला उपचार करून बरे करणारे तसेच वारकरी संप्रदायावर अत्यंत निष्ठा श्रद्धा ठेवून साधू संतांची सेवा करणारे आदर्श डॉ. श्री पांडुरंग फड साहेब यांच्या सारखे डॉ. समाजात असल्यामुळे पेशंट लवकरात लवकर पूर्ण पणे बरे होतात आणि त्यांच्या मनात डॉक्टरांविषयी आदराची भावना व्यक्त होते असे महाराजांनी सांगितले. यावेळी डॉ. पांडुरंग फड साहेब यांनी असे म्हटले की फड मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल येथे वारकरी संप्रदायातील नामवंत कीर्तनकार, गायक मृदंग वादक आदी मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार असे म्हणाले. ***

# प्रा.नागनाथ दहिफळे यांना पीएच.डी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- प्रा. नागनाथ केशवराव दहिफळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथून वनस्पतीशास्त्र (Botany) विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय होता.

बीड जिल्ह्यात बाल आरोग्य सेवेसाठी वनस्पती-आधारित पारंपरिक उपायांचा अभ्यास. हे संशोधन प्रा. डॉ. सविता सुकते यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. ग्रामीण वैद्यकीय वारशाला प्रा. दहिफळे यांनी पारंपरिक ज्ञानाच्या आधारे बाल आरोग्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्थानिक औषधी वनस्पतींचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या संशोधनामुळे स्थानिक उपचार पद्धतींच्या शास्त्रीय पुनर्मूल्यांकनाला मदत मिळेल.

सध्या ते वैजनाथ महाविद्यालय, परळी येथे कनिष्ठ व वरिष्ठ वर्गांना वनस्पतीशास्त्र विषय शिकवत आहेत. त्याचबरोबर, व्हिजन क्लासेसमध्ये देखील जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत असल्याने, विद्यार्थ्यांमध्ये ते विशेष लोकप्रिय आहेत. अभ्यास अध्यापन व संशोधन या माध्यमातून प्रा. दहिफळे यांनी केलेले कार्य हे नवीन संशोधकांसाठी प्रेरणादायी आहे. ***

# अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती

बीड, (जिमाका) : जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बीडच्या वतीने मध्ये अंमली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त जनजागृती शिबीर बीडच्या सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालयात काल (ता.२६) पार पडले.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव रेणुका एम. सातव, प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल, डॉ. मुजाहिद ईस्माइल, तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे, मिथुन जोगदंड, शामसुंदर शिंदे, ओंकार नाईकवाडे, रोहन दिवे उपस्थित होते. या शिबीरात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आदी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. महेंद्र गोशाल यांनी केले. अंमली पदार्थ विरोधी जागरूकता आणि नशामुक्ती दिशादर्शक अंमली पदार्थ भारत योजना २०२५ (AWN POSH ACT), समितीची स्थापना याबाबत श्रीमती सातव यांनी मार्गदर्शन केले. डॉ. मुजाहिद मोहम्मद यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगितले.अशोक तांगडे यांनी सायबर सुरक्षा यावर मार्गदर्शन केले. तत्वशिल कांबळे यांनी व्यसनाचे दुष्परिणाम यावर मार्गदर्शन केले. ओंकार नाईकवाडे यांनी नालसा हेल्पलाईन नंबर १५१०० या विषयी मार्गदर्शन केले. **

# ‘महिला आर्थिक विकास महामंडळाकडून लाडकी बहीण पतसंस्था सुरू होणार’

बीड, (जि.मा.का.):- महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था सुरू करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांकडून ७०० रुपयांचे शेअर्स आणि १०० रुपये सभासद शुल्क घेण्यात येणार आहे. त्यानंतर त्या पतसंस्थेच्या सदस्य बनतील. सदस्य झाल्यानंतर त्या महिला आपली रक्कम सुरक्षितपणे जमा करून स्वतःच्या गरजेनुसार कर्जरूपाने खेळते भांडवल मिळवू शकतील.


अनेक महिलांना बँकेत खाते काढणे, कर्ज मिळविणे अथवा व्यवसाय सुरू करताना आर्थिक नियोजन करणे कठीण जाते. त्यांच्यासाठी ‘लाडकी बहीण पतसंस्था’ एक विश्वासार्ह आणि सहजसोपे व्यासपीठ ठरणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून महिलांना केवळ बचतच नव्हे, तर स्वावलंबनाची नवी दिशा मिळेल, असे महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. बीड जिल्ह्यात लाडकी बहीण पतसंस्था बाबत प्रक्रिया सुरू केली आहे. या पतसंस्थेत केवळ लाडकी बहीण योजनेतीलच नाही तर महिला आर्थिक विकास महामंडळ बचत गटातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि दिव्यांग महिलांनाही सामावून घेतले जाणार आहे. ***


## खरय.. पण...



पेट्रोल-डिझेलचा टँकर गळका नसतो. फक्त पाण्याचेच टँकर गळके का असतात? कारण पाणी जरी जीवन असलं तरी ते निसर्गातून फुकट मिळतं आणि फुकट मिळणाऱ्या गोष्टीची माणसाला किंमत नसते.

## हसरा कोपरा..!





संपादकीय...

# दुबार पेरणीचे संकट..?

*** सुविचार ***

**माणसानं एकटं पडल्यावर घाबरायचं नसतं. माणूस हा रणांगणात, सिंहासनावर आणि स्मशानात देखील एकटाच असतो.**

यंदा भर उन्हाळ्यात मे महिन्यात पावसाळ्यासारखा धो-धो बरसणारा पाऊस पावसाळ्याचा जून महिना सुरू झाल्यानंतर मृगनक्षत्राच्या सुरूवातीपासून गायब झाला. आज तीन आठवडे उलटूनही पावसाचा पत्ता नाही. जून महिन्यातील पावसाबाबत हवामान खाते व अभ्यासकांनी दिलेला अंदाजही खोटा ठरला आहे. मे महिन्यातील पाऊस व जूनच्या प्रारंभी झालेल्या पावसावर मृगनक्षत्राच्या सुरूवातीला आपल्याकडे काही शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्या केल्या. परळीच्या तुलनेत शेजारच्या अंबाजोगाई तालुक्यात मोठ्या प्रमाणात खरिपाच्या पेरण्या झाल्या. उपलब्ध आकडेवारीनुसार अंबाजोगाई तालुक्यात सत्तर टक्क्यावर खरिपाच्या पेरण्या शेतकऱ्यांनी केल्या होत्या. परळी तालुक्यात सुमारे पन्नास टक्के पेरणीचे काम झाले होते. आपल्याकडे पेरण्या सुरू असतानाच पावसाने उघडीप दिली. वारा सुटल्याने पाऊस थांबला आज तीन आठवड्यापासून पाऊस झाला नाही. सुटलेला वारा, पडणारे कडक ऊन, मोठे तापमान यामुळे जमिनीतील ओलावा सुकत गेला. याचा परिणाम पेरणी केलेल्या खरिपाच्या पिकांवर झाला व इतर पेरणीची कामे खोळंबली. ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनाची सोय आहे. त्या शेतकऱ्यांनी उपलब्ध पाण्यावर पिके जपली परंतु ज्या शेतकऱ्यांच्या शेतजमीनी कोरडवाहू आहेत. पाण्याची सोय नाही. त्या शेतकऱ्यांच्या शेतात पेरणी झालेल्या खरिपाच्या पिकांवर मोठा परिणाम झाला. पिके वाढणीच्या काळातच पावसाने गुंगारा दिल्याने पिकांची वाढ खुंटली. काही ठिकाणी तर पेरलेले बी उगवलेच नाही. डोंगर माथ्यावर व हलक्या शेत जमीनीतील उगवलेले पीक पाण्याअभावी पिवळे पडून करपून गेले व जात आहे.

आकाशात रोज पावसाचे काळेकुट्ठ ढग जमा होतात. पाऊस पडेल असे वातावरण तयार होते. तोच सुटलेल्या वाऱ्याने ढग गुंगारा देऊन निघून जातात. यामुळे सर्वांचीच घोरनिराशा होते. असा खेळ गेल्या तीन आठवड्यापासून आपल्याकडे सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना मोठी काळजी लागली आहे. 'ज्याच्या त्याच्या तोंडी, पाऊस कुठे गेला? पाऊस का पडेना?' हेच प्रश्न आहेत. वारा थांबल्याशिवाय पाऊस पडत नाही असे काही जाणकार सांगत आहेत तर आपल्याकडे पावसाळ्याच्या सुरूवातीला पाऊस पडतो त्यानंतर आषाढीवारी परतल्याशिवाय पाऊस पडत नाही, हा पावसाळ्याबाबतचा अंदाज काही वयोवृद्ध मंडळी मांडत आहेत. पेरलेले पीक सुकत चालल्याने तालुक्यातील शेतकरी मोठे चिंताग्रस्त झालेले आहेत. पेरणीपूर्व मशागतीची कामे, खते, बी-बियाण्यांचा व इतर औजारे आणि साहित्याचा झालेला खर्च तसेच त्यात पाऊस नसल्याने लागलेली चिंता. यामुळे शेतकरी अडचणीत आहे. येत्या काही दिवसांत पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे संकट कोसळणार आहे. शेतमालाला नसलेला भाव. शेतमजुरांची वाढलेली मजूरी, खते, औषधे, बी-बियाण्यांच्या दरात झालेली मोठी वाढ यामुळे शेतात दुबार पेरणी करणे परळी तालुक्यातील शेतकऱ्यांपुढे मोठे आव्हान आहे.

पाऊस पडावा म्हणून शेतकरी देव-देवतांना साकडे घालत आहेत. प्रार्थना करत आहेत. विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. परंतु पाऊस पडत नाही. आलेला दिवस आला तसा जात आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

पावसाबाबत आपल्याकडे असे नेहमीच होत आहे. यामुळे शेतीचे गणितच बिघडत चालले आहे. याचा शेतीच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम झाला आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत चालला आहे. हवामानातील बिघाड, बदललेली स्थिती याबाबत व्यापक संशोधनाची व उपाययोजनेची गरज आहे. ऋतूचक्र पूर्ववत होण्यासाठी पर्यावरण वाचवणे आपल्यापुढे मोठे आवाहन आहे. ***

# छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज 'वसा आणि वारसा'

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा वारसा पुढे चालवणारे, धर्मसुधारणा, अंधश्रध्दा विरोध, जातिनिर्मुलन, राजकीय सत्तेत समान वाटा, राखीव जागा, शेतीसुधारणा व अधिकारासाठी संघर्ष हे सत्यशोधक विचार स्वीकारुन आचरणात आणणारे, परिवर्तनवादी विचारवाहक, आरक्षणाचे जनक छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज यांना विनम्र अभिवादन....!**

वर्तमानाचे भान ठेवून असतात तेच इतिहास घडवतात, भविष्याचे वेध ज्यांना लागलेले असतात आणि परिवर्तनासाठी जे झपाटून गेलेले असतात तेच इतिहास घडवतात याचे आदर्श उदाहरण म्हणजे छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज ज्यांनी स्वत:च्या संबंध आयुष्यात जातीधर्मातील भेदाला कधीच थारा दिला नाही ते छत्रपती राजर्षी शाहुजी महाराज आणि खऱ्या अर्थाने त्यांच्या विचारांची विशालता लक्षात घेतली तर त्यांचे वारस असावेत कसे तर ते असावेत सरकारी निमसरकारी नोकऱ्यामध्ये राखीव जागा ठेवल्यास समर्थन देणारे, सर्व जाती-जमातींना त्यांच्या शिक्षण, संख्येप्रमाणे शासकीय निमशासकीय नोकरीत तसेच राजकीय प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे याचे समर्थन करणारे जातनिहाय जनगणना व्हावी याचे समर्थन करणारे चातुरवर्ण्य व्यवस्था,सतीप्रथा,उच-नीचता म्हणजेच मनुस्मृती नाकारणारे या विचारांचे २६ जुलै १९०२ रोजी छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांनी आपल्या संस्थानात ५०% जागा राखीव ठेवून आरक्षणाची संकल्पना अमलात आणली व ते आरक्षणाचे जनक ठरले. समाजात नोकऱ्या न मिळाल्यामुळे अनेक तरुण वाईट मार्ग स्वीकारतात अशा या तरुणांना अंगरक्षक, पहारेकरी,रथावर वाहक तसेच जमिनी देऊन प्रतिष्ठेचे जीवन जगण्यास प्रोत्साहित केले.मणभर विचारांपेक्षा कणभर आचरण श्रेष्ठ या उक्तीप्रमाणे कृतींवर भर देणारे ते एक कार्यकर्ते राजे ठरले.त्यांच्या काळातील स्त्रियांची स्थिती विदारक होती.स्त्रियांसाठी त्यांनी स्त्रीशिक्षणास चालना देऊन विधवा विवाह आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देऊन स्त्रियांना माणुसकीचे सर्व हक्क प्रदान करण्याचे मोलाचे कार्य छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांनी केले.

शिक्षण हा राष्ट्रोन्नतीचा सर्वात महत्वाचा भाग. छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांनी शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन शिक्षण सक्तीचे केले. जर मुलगा शाळेत आला नाही तर पालकांना दंड केला. अनेक जाती-जमातींसाठी त्यातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था केली.त्याकाळी कोल्हापुरात वसतिगृहांची पहिली स्थापना झाली म्हणुन आज कोल्हापुराला वस्तीगृहाची जननी म्हणुन ओळखले जाते.शाळेत स्पृश्य-अस्पृश्य भावना मोडीत काढाली.सर्व जाती-जमातीच्या मुलांना समानतेची वागणुक



देण्यासाठी कायदा केला. दीन-दलित, गोर-गरीब, शेतकरी-कष्टकरी यांच्या मुलामुलींना शिक्षणांच्या सोई उपलब्ध करवून दिल्या.दीनदलितांना जवळ केले.स्वातंत्र्यलढयासाठी छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांची भुमिका स्पष्ट होती. मुठभर लोकांच्या हातात स्वराज्य जाता कामा नये. त्यासाठी आपण पात्र झाले पाहिजे म्हणजेच शिक्षण घेतले पाहिजे. जातीभेद गाडले गेले पाहिजेत,राजकीय आणि सामाजिक सुधारणा बरोबर झाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी कार्य केले.आज ज्या लोकशाही पद्धतीवर आपला देश चालतो आहे त्या लोकशाही राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्याकाळी मोलाचे सर्व सहकार्य देण्यात सिंहाचा वाटा असलेले हेच ते छत्रपती राजर्षी शाहुजी महाराज ज्यांच्या प्रतिमेवरच प्रेम मर्यादित न ठेवता विचारांचा जयजयकार करुन चित्राची पुजा न करता चारित्राची पुजा करणे, उत्सवाच्या गदारोळात विचारांची होरपळ होणार नाही याची दक्षता घेणे महत्वाचे आहे. आज छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांचे स्मरण करताना त्यांचा वसा आणि वारसा कोणता हे आपणास पाहावे लागेल. जयजयकार करणारे कोण खरे आणि कोण खोटे हे तपासावे लागतील. त्यांचा हेतु तपासावा लागेल जातिपरिषदा असाव्यात परंतु जातीच घट्ट होणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल. जाति परिषदा भरवून माणसांची मने ही शिक्षणाने सुसंस्करित, उच्च दर्जाची, मानवजातीचे कल्याण करणारे होतील याचा जागर करावा. आणि विशेष म्हणजे जाति परिषदांच्या माध्यमातून जातिअंताचा लढा उभा करावा.आज बहुजनातील मोठा भाऊ कुणबी मराठा आरक्षण हा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना फक्त आरक्षण मिळालेच पाहिजे असे न म्हणता इतर सर्व समाज बांधवांच्या आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण कसं देता येईल यावर विचारविनिमय होऊन प्रश्न मार्गी लावणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. छत्रपती शाहुजी महाराजांनी त्यांच्या काळात शेतकऱ्यांसाठी शेतात केलेली सिंचन व्यवस्था ज्यामुळे आज कोल्हापुरातील राधानगरीसारख्या धरणामुळे भाग सुजलाम सुफलाम आहे.त्यांची हीच दृष्टी आजच्या राजकीय वर्गामध्ये येणे गरजेचे आहे.जेणेकरुन शेतकऱ्यांच्या जमिनिला भरपूर प्रमाणात पाणीपुरवठा होऊन,शिवार जलसंपन्न झाल्यामुळे मुबलक प्रमाणात उत्पादन निघेल व उत्पादन खर्चावर शेतीमालाला बाजारात हमीभाव मिळेल तरच शेतीला आणि शेतकऱ्याला चांगले दिवस येतील. छत्रपती शाहुजी राजांच्या काळात शेतकरी आत्महत्यामुक्त होता ही बाब लक्षात घेऊन आजघडीला आत्महत्यामुक्त शेतकरी होण्यासाठी शासकीय व राजकीय पातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.शेतकरी कष्टकऱ्यांच्या लेकरांच्या लेखणीला धार आणि त्याला व्यावसायिक शिक्षणाची जोड मिळाली तर उद्या राष्ट्राची प्रगती निश्चित आहे.यासाठी शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक सवलती देऊन शेतकऱ्यांच्या लेकरांना शिक्षण आणि नोकरी देणे महत्वाचे आहे.व्यसनाने तरुणवर्ग बरबाद होत चाललेला असताना व्यसनमुक्त तरुण होण्यासाठी प्रबोधन होणे गरजेचे आहे. जातिजातीमध्ये होणाऱ्या दंगली या समाजाच्या विनाशास कारणीभुत आहेत म्हणून आपला महाराष्ट्र दंगलमुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी तुम्ही आम्ही सर्वांनी प्रयत्नात्मक पावलं उचलणं गरजेचे आहे.छत्रपती राजर्षी शाहुजी महाराजांनी घेतलेला कार्याचा वसा आणि त्यांचा वारसा पुढे चालु ठेवण्यासाठी आजपासून आपण सर्वजण सज्ज होऊयात यासाठी सर्वांना हार्दिक आणि उदंड शुभेच्छा.

**– रामकिसन गुंडीबा मस्के**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतीलच असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०९ * अंक ०८ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ३० जून २०२५ * किंमत : २ रू.

# दुचाकी चालवताना हेल्मेट वापरण्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन

बीड, (जिमाका) : जिल्हयातील सर्व नागरिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. याबाबत वेळोवेळी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट सक्तीचे आहे, असे निर्णय दिलेले आहेत.

जिल्ह्यात सन २०२४ मध्ये रस्ता अपघातामधील मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू दुचाकीस्वार यांचे झालेले आहेत. यामध्ये ६० % पेक्षा जास्त अपघात मृत्यू हेल्मेट परिधान न करता गाडी चालविल्यामुळे झालेले दिसून येत आहेत. जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाची भूमिका महत्वाची आहे. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी हे प्रशासनाचा कणा समजण्यात येतात. शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वर्तन समाजासाठी नेहमीच अनुकरणीय असे आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना, सार्वजनिक रस्त्यावर वावरताना हेल्मेट परिधान केल्यास सर्व नागरिकांमध्ये हेल्मेट परिधान करण्याबाबत जनजागृती होते. त्यामुळे वाहनधारक स्वयंप्रेरणेने हेल्मेट वापरण्यासाठी प्रवृत्त होतात. जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद येथील अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना, रस्त्यावर दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना दिले आहेत. ***

## दहावी, बारावी परीक्षा केंद्र परिसरात मनाई आदेश

बीड, (जिमाका) : जिल्ह्यामध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून-जुलै-२०२५ आयोजित केल्या आहेत. बारावीची १६ जुलैपर्यंत आणि दहावी ८ जुलैपर्यंत परीक्षा आहे. या परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात व परीक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी, अनाधिकृत कृत्य होऊ नये याकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत.

परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आदेश लागू राहणार नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक इ. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदरपासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे. बीड जिल्हयाच्या हद्दीतील परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी ०८ जुलैपर्यंतच्या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परीक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी आदेश लागू राहतील, असेही आदेशात नमूद आहे.**

## दरवळणारा सुगंध...

नाती अशी असावी ज्यावर अभिमान असावा, काल जेवढा विश्वास होता तेवढाच आज असावा, नातं फक्त ते नाही जे दुःख आणि सुखात सोबत करतं, नातं ते असतं जे आपलेपणाची जाणीव करून देतं..!

